**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात**

**एस.सी.सी ४८४/२०२३** **निशाणी - 25**

## गुन्ह्याचा तपशिल

१. गुन्हा घडल्याची तारीख - १७.०६.२०२३

२. फिर्याद दिल्याची तारीख - २४.०६.२०२३

३. फिर्यादीचे नाव व पत्ता - महाराष्ट्र शासन, मार्फत
पोलीस स्टेशन अकोले,
ता. अकोले, जि. अहमदनगर.

४. आरोपींचे नाव व पत्ता - १. भरत विठ्ठल रेवगडे,
वय-२६, रा. ठाणगाव पाडळी,
ता. सिन्नर, जि. नाशिक.

२. प्रदीप रावसाहेब भालेराव,
वय- ५५, रा. गणोरे,
ता. अकोले, जि. अहमदनगर.

३. सुमित नामदेव जाधव,
वय -२३, रा. शहापंचाळे,
ता. सिन्नर, जि. नाशिक.

४. विलास रामकृष्ण तोरमल,
वय - ४५,

५. सुमन विलास तोरमल,
वय - ३५,

६. सुशिल विलास तोरमल,
वय - १८,
आरोपी क्र. ४ ते ६ रा.पिंपळगाव
निपाणी, ता. अकोले, जि. अ.नगर.

५. फिर्यादीमधील मजकुर आरोपींस समजावुन सांगितला

पहिले असे की, तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने दिनांक १७.०६.२०२३ रोजी सायंकाळी ०७:३० वाजताचे

७

दरम्यान पिंपळगाव निपाणी येथे फिर्यादीस व फिर्यादीचे चुलते संपत व आत्या सुनिता यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक जखमी केलेत आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ३२३ सहकलम १४९** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

दुसरे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने फिर्यादीकडून व साक्षीदारांकडून सार्वजनीक शांततेचा भंग व्हावा अथवा अन्य गुन्हा घडावा या उद्देशाने त्यांना जाणीवपुर्वक शिवीगाळ करुन शांततेचा भंग करण्यास उद्युक्त केलेत आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ५०४ सहकलम १४९** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

तिसरे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने फिर्यादीस व फिर्यादीचे चुलते संपत व आत्या सुनिता यांना जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा दिलात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ५०६ सहकलम १४९** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

चौथे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने म्हणजेच फिर्यादी आणि साक्षीदारांविरोधात दंगा करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमावाचा जाणीवपुर्वक घटक झालात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम १४३ सहकलम १४९** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

६. आरोपींचे कथन –

प्रश्न १ – तुम्हांला केसच्या संपुर्ण नकला मिळाल्या काय ?

उत्तर – हो। २१

प्रश्न २ – तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप तुम्हांला वाचुन व समजावुन सांगितला, तो समजला काय ?

उत्तर – होय

प्रश्न ३ – तुम्हांला सरकारी खर्चाने तुमच्या बचावासाठी वकील पाहिजे काय ?

उत्तर – नाहि

प्रश्न ४ – तुम्हांला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर – नाही.

१. ............................

२. ............................

३. ............................

४. ............................

५. ............................

६. ............................

आरोपींची सही / अंगठा

समक्ष,

१.१०.२०२५

**( अनंत रा. टेंगसे )**

सह दिवाणी न्यायाधीश क, स्तर,

**अकोले**

दिनांक– ०१.१०.२०२५